निशाणी - ५४

**<u>सरकारतर्फे सा. क्र .३ ची साक्ष</u>**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

**नाव** - **इक्बाल बाबुलाल शेख,**

**वय** - ६७ वर्षे

**व्यवसाय** - सेवानिवृत्त, पोलीस सब इन्स्पेक्टर,

**राहणार** - श्रीरामपूर, जि. अहमदनगर

**<u>सरतपास सरकारी वकील श्री. ए. बी. चौधरी यांचेमार्फत-</u>**

दि.२०.०३.२०१७ रोजी मी शेवगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी माझ्याकडे गु.र.क्र.१०३/२०१७ चा तपास देण्यात आला. सदर बाबत पोलीस ठाणे अंमलदार यांनी मला लेखी आदेश दिला. आता मला सदर आदेश दाखविला. त्यावर पोलीस ठाणे अंमलदार यांची सही असून माझे नाव आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.५५</u>** देण्यात येते. आदेशासोबत मला फिर्याद देण्यात आली. मी फिर्यादीचे अवलोकन केले. दि.२१.०३.२०१७ रोजी मी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरुन मला एक लोखंडी पाईप व बांबुचे दांडके मिळून आले. ते मी घटनास्थळावरुन दोन पंचांसमक्ष पंचनाम्याद्वारे जप्त केले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.४५ दिलेली आहे. त्यानंतर सदर मुद्देमाल कारकुनाकडे जमा करुन मुद्देमाल पावती प्राप्त केली. आता मला मुद्देमाल पावती दाखवली. ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.५६</u>** देण्यात येते. मी सदर गुन्हयातील आरोपींना अटक केली व त्यांचा अटक पंचनामा तयार केला. आता मला चारही अटक पंचनामे दाखविले. ते बरोबर आहेत. त्यावर आरोपींचे फोटो व पंचांची, माझी व आरोपींच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि. ५७ ते ६०</u>** देण्यात येते. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. सपकाळे यांना सुपुर्त केला. श्री. सपकाळे यांनी खाकी शर्टचा जप्ती पंचनामा केला. आता मला सदर पंचनामा दाखविला. त्यावर श्री. सपकाळे यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यास नि.५० देण्यात आली आहे. दि.२४.०३.२०१७ रोजी श्री. सपकाळे

**निशाणी - ५४**

यांनी होंडा शाईन दुचाकी वाहनाचा जप्ती पंचनामा केला. आता मला सदर पंचनामा दाखविला. त्यावर श्री. सपकाळे यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यास नि.४६ देण्यात आली आहे.

२. मला तपासांती असे निष्पन्न झाले की, आरोपींनी शासकीय कर्मचारी सुधीर दत्तात्रय खाडे, पोलीस कॉन्स्टेबल हे शासकीय कामकाज करीत असतांना त्यांना मारहाण केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. आरोपी यांना मी ओळखू शकतो. आज दोन आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. ए. बी. काळे यांचेमार्फत-**

३. मी शेवगाव पोलीस स्टेशन येथे सन २०१६ ते २०१७ या कालावधीत पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजुला दाट लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात ज्या वाहनाने मी पंचनाम्याकरीता गेलो त्याचा क्रमांक नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील पंच पोलीस स्टेशनचे कायमचे पंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये बसून तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावरुन लोखंडी पाईप व बांबुचा दांडका जप्त केला असे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा घटनास्थळ पंचनामा केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

RUTUJA SHRIKANT BHOSALE

Digitally signed by RUTUJA SHRIKANT BHOSALE DN: cn=RUTUJA SHRIKANT BHOSALE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6947655, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN Date: 2026.01.31 11:07:23 +0530

**( ऋतुजा श्री. भोसले )**

दि. ३०/०१/२०२६ अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर